# जाहीर लिलाव

## दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) व न्यायदंडाधिकारी वर्ग-१, मालवण

तमाम लोकांना याद्वारे कळविण्यात येते की, या कार्यालयाच्या निर्लेखित करावयाच्या खालील उपकरणांची शासनाच्या शासन निर्णयाप्रमाणे जाहीर लिलावाद्वारे विक्री करावयाची आहे. सदर वस्तुंची अनुसूची खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | तपशील | प्रतिनगाची आधारभूत किंमत | एकूण नग | एकूण आधारभूत किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | Kiosk Machine | २०४/- | १ | २०४/- |
| २ | Fax Machine | १००/- | १ | १००/- |

सदर लिलाव या न्यायालयाचे आवारात दिनांक १५ मे सन २०२६ रोजी सकाळी ११.०० वा. सुरु होईल. ज्या कोणास लिलाव घ्यावयाचा असेल त्यांनी स्वतः अगर योग्य रीतीने अधिकार दिलेल्या प्रतिनिधी मार्फत हजर रहावे.

### विक्रीच्या शर्ती

१. सोबतच्या अनुसूचीमध्ये नमूद असलेल्या वस्तूंची माहिती कार्यालयाच्या उपलब्ध माहिती व कागदपत्रांनुसार देणेत आलेली आहे. सदरच्या वस्तू ज्या स्थितीत आहेत. त्याच परिस्थितीत लिलावाने विक्री करावयाच्या आहेत.

२. लिलाव ६०% मूळ किंमतीतुन घसारा कमी करुन आलेल्या किंमती पेक्षा वाढविणे हे विक्री करणा-या अंमलदाराने ठरवावयाचे आहे. जर कोणत्याही प्रकारे लिलावाच्या रकमेवर लिलाव मागणेबद्दल वाद उपस्थित झाल्यास लिलाव ताबडतोब पुढील तारखेस निश्चित करणेत येईल.

३. जो कोणी सर्वात जास्त बोली बोलेल त्यास सदर वस्तू विकल्या जातील. मात्र सर्वात जास्त बोललेली बोली योग्य किंमतीची नाही असे लिलाव पुकारणार अंमलदारास वाटल्यास लिलाव नाकबूल करण्याचा खास अधिकार खाली सही करणार यांना आहे.

४. लिलावात बोली केलेली अंतिम किंमत मान्य केल्यास लिलाव घेणा-या व्यक्तीला ती त्वरीत कार्यालयात भरणा करावी लागेल आणि अशी किंमत भरण्यास कसूर केल्यास त्याची जंगम मालमत्ता जप्त करुन वसुली केली जाईल.

५. लिलाव मंजूर अगर नामंजूर करण्याचा अंतिम अधिकार खाली सही करणार यांनी राखून ठेवलेला आहे.

आज दिनांक ०५ माहे मे सन २०२६ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

Civil Judge (J. D.), Malvan
दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), मालवण

दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) व
न्यायदंडाधिकारी वर्ग-१, मालवण.

*************

म.जा.क्र. २०३४ सन २०२६.
दिवाणी न्यायालय (क.स्तर), मालवण
दिनांक :- ०५/०५/२०२६.

प्रत माहितीसाठी व जरूर त्या कार्यवाहीसाठी सविनय सादर.

१. मा. दिवाणी न्यायाधीश (व. स्तर), सिंधुदुर्ग ओरोस. (ई-मेलद्वारे)

२. मा. मुख्यन्यायदंडाधिकारी, सिंधुदुर्ग ओरोस. (ई-मेलद्वारे)

३. मा. सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सिंधुदुर्ग ओरोस. (ई-मेलद्वारे)

४. मा. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), कुडाळ, सावंतवाडी, वेंगुर्ला, कणकवली, देवगड, दोडामार्ग. (ई-मेलद्वारे)

५. मा. प्रबंधक, जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग (जिल्हा न्यायालयाचे संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी) (ई-मेलद्वारे)

६. मा. सहायक अधिक्षक (वित्त), जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग ओरोस. (ई-मेलद्वारे)

७. मा. तहसिलदार, मालवण. (ई-मेलद्वारे)

८. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, नगरपरिषद, मालवण. (ई-मेलद्वारे)

९. मा. गटविकास अधिकारी, पंचायत समिती मालवण. (ई-मेलद्वारे)

१०. मा. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), मालवण यांचे न्यायालयातील नोटीस बोर्डवर.

शाखा वित्त /लेखाशाखा
दाखल दिनांक ०६/०५/२०२६
मराठी आवक क्र. ६३३२

O/C